# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** कारंजा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0319 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/05/2024 00:24

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 08/05/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/05/2024
**Time From (वेळेपासून):** 14:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:08 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/05/2024 **Time (वेळ):** 23:58 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 043

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/05/2024 23:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पोस्टे कारंजा ग्रामिण ,कारंजा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** श्री.दिलीप बळवंतराव सोळंके
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1959
   (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
   **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कवठळ तामंगरुळपीर जिवाशिम ,मंगरुळपीर,कारंजा,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कवठळ तामंगरुळपीर जिवाशिम ,मंगरुळपीर,कारंजा,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

   (i) **Occupation (व्यवसाय):**
   (j) **Phone number (फोन नं.):**
   **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शिवदास मंगुर्सिंग चव्हान साह्य्यक पो उप निरिक्षक ब नं 690 | | | 1. पोस्टे कारंजा ग्रामिण जि वाशि, कारंजा,कारंजा,वाशिम,महाराष्ट्र, भारत |
| 2 | निलेश विष्णुपंत थेर पोकाँ ब नं 930 | | | 1. पोस्टे कारंजा ग्रामिण जि वाशि, कारंजा ,कारंजा,वाशिम,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोस्टे कारंजा शहर

दिनांक:- 09/05/2024.

नावः- श्री.दिलीप बळवंतराव सोळंके वय 65 वर्ष व्यवसाय - शेती रा.कवठळ ता.मंगरुळपीर जि.वाशिम

मी वरील ठिकाणी राहत असुन माझा व्यवसाय शेती आहे. माझी कवठळ येथे 04 एकर व सोहळ ता.कारंजा येथे 09 एकर शेती असुन सदर शेती वाहतो. दि.07/05/2024 रोजी मी ला.प्र.वि.कार्यालय वाशिम येथे गेलो असता. तेथे माझी पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड यांचेसोबत भेट झाली. मी लाच मागणी संबंधाने त्यांना सविस्तर सांगीतले. त्यांनी माझी तक्रार ऐकुण घेतली. मी त्यांना सांगीतले की जमादार चव्हाण पो.स्टे.कारंजा ग्रामिण यांनी मला उदया दि.08/05/2024 रोजी भेटण्यासाठी बोलावले आहे त्यामुळे तुम्ही दि.08/05/2024 रोजी कारंजा येथे या. त्यावर पो.नि.तिप्पलवाड यांनी मला सांगीतले की आम्ही उदया स्टाफ व पंचासह कारंजा येथे येउन आपणास भेटतो व पंचासमक्ष आपली तक्रार नोंदवुन घेउन पुढील कारवाई करु. ठरल्याप्रमाणे दि.08/05/2024 रोजी पो.नि.तिप्पलवाड,दोन पंच व लाप्रवि स्टाफ हे कृषी उत्पन्न बाजार समिती कारंजा येथे आले. पो.नि. तिप्पलवाड यांनी मला फोन लावल्याने मी त्या ठिकाणी गेलो.तसेच तक्रारीचे पडताळणी करीता आलेल्या पंचाना माझी ओळख करुन दिली. त्यानंतर पो.नि.तिप्पलवाड यांनी मला तक्रार लिहुन देण्यास सांगीतल्याने मी दिलेल्या एन.सी.रीपोर्टवर कारवाई करतो व तुमच्यावर अॅट्रोसिटी केस व इतर कारवाई होउ देत नाही या करीता जमादार चव्हाण पोलीस स्टेशन कारंजा ग्रामीण हे 20,000/- रु ची लाच मागणी करत असल्याची तक्रार दोन्ही पंचासमक्ष माझे हस्ताक्षरात लिहुन दिली. त्यावर दोन्ही पंच,तक्रारदार म्हणून माझी व पोलीस निरीक्षक बालाजी तिप्पलवाड यांनी सहया केल्या.

पोलीस निरीक्षक तिप्पलवाड यांनी मला पडताळणी कार्यवाही बाबत, तसेच मेमरी कार्ड व व्हाईस रेकॉर्डर चे कार्यप्रणाली बाबत समजावून सांगितले. मला, पंच क्र.1 श्री घुगे यांचेसह जमादार चव्हाण पोलीस स्टेशन कारंजा ग्रामीण यांचे भेटीकरीता व्हाईस रेकॉर्डर लावुन पोलीस स्टेशन कारंजा ग्रामीण येथे पाठवीले असता पोलीस स्टेशन कारंजा ग्रामीण येथे काही लोकांची गर्दी दिसली. त्या ठिकाणी जमादार चव्हाण हे होते त्यांनी मला "राम राम" केला मी जमादार चव्हाण यांना नमस्कार चव्हाण साहेब म्हटले. त्यावर जमादार चव्हाण मला म्हणले "कुठं गेलते तुम्ही दिसले नाही...बसानं इथं इकडं या...बसा जरासे आपले काम होउ दया...सगळे आज काम करुन टाकायचे निल" मी जमादार चव्हाण यांना म्हटले की " म्हाला माल हराशीत मी भरण चालु आहे" त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले "बर जाणं तुम्ही जा... तुमचे कामं करुन या" असे बोलल्यावर मी जमादार चव्हाण यांना "हो" म्हटले व त्याठिकाणवरुन पंचासह परत आलो. सदर संभाषण हे लॅपटॉपवर ऐकल्यावर पोलीस निरीक्षक तिप्पलवाड यांनी मला सांगीतले की,लाचे संबधाने कुठलीही बोलणी झाली नसल्याने व जमादार चव्हाण यांनी पुन्हा बोलावील्याने तुम्हाला पुन्हा एकदा पडताळणी करीता पाठवतो असे सांगीतले. पाठवीने अगोदर मी जमादार चव्हाण यांना फोन लावला असता त्यांनी मला पोलीस स्टेशन कारंजा ग्रामिण येथे बोलावले. त्यानंतर काही वेळाने मला व्हाईस रेकॉर्डर लावुन व माझे सोबत पंच क्र.01 श्री.घुगे यांना पाठवुन परत पडताळणी करण्यात आली. भेटी दरम्यान मी जमादार चव्हाण यांना म्हटले "म्या म्हणलं आहात की नाही" त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले. "काय आणलं होतं चणा " मी जमादार चव्हाण यांना म्हटले " चव्हाण साहेब यातलं तेव्हडा मले अभ्यास नाही पाहा बाँ त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले. " करुन देतो आत्ता करता..." मी जमादार चव्हाण यांना म्हटले " बोलानं किती दया लागतात....आणतो दलाला जवळुन " त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले. "साहेबालं विचारलं..." त्यावर मी

जमादार चव्हाण यांना म्हटले "काय म्हणत ते?" त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले "चांगलेच सांगुन राहीले की, अँट्रोसिटी मधुन काढा लागल न म्हणत त्याहले.. " मी जमादार चव्हाण यांना म्हटले "हं... स्पष्ट स्पष्ट सांगा किती दया लागते? " त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले. "20" असे म्हणुन जमादार चव्हाण यांनी 20 चा आकडा कागदावर लिहुन दाखवीला त्यामुळे मी जमादार चव्हाण यांना म्हटले हे "20 " जमादार चव्हाण मला म्हणाले. " हं " त्यावर मी जमादार चव्हाण यांना म्हटले " हे 2 हजार हेत की 20 हजार हेत?..... 20 हजार " त्यावर जमादार चव्हाण म्हटले " काही काळजी करु नका अँट्रोसिटी काढुन टाकतो... फक्त तहसील ची केस राहील.. " त्यावर मी जमादार चव्हाण यांना म्हटल " आता दलालानं पैसे देले पाहीजे... चव्हाण साहेब 20 हजार.... उदया पाहीटी दिले त चालले का मंग? " जमादार चव्हाण मला म्हणाले. " नाही नं... " त्यावर मी जमादार चव्हाण यांना म्हटल मंग आत्ताच देतो चला....जेव्हडे देले तेव्हडे... मंग मलं चेक वटवा लागलं चेक तयार करनं चालु आहे..... त्यालं म्हणल चेक दया... कॅशमध्ये ते दोन टक्के कमीशन घेतो... त्यावर जमादार चव्हाण मला म्हणाले. " त्यालं म्हणा 20 सध्याचे देउन टाक म्हणा... " त्यावर मी जमादार चव्हाण यांना म्हटल " कमी देले त कसं कराव? त्यानं जर चेक बनवला त काय देणार हे तो? कस साहेब म्हणुन मी दुपारी आलतो तुमच्याकडं " " त्यावर जमादार चव्हाण मला म्हटले " समोरच्याले मॅनेज करुन टाकु " त्यावर मी जमादार चव्हाण यांना म्हटल पंधरा मिनीटात... अर्धा घंटयात वापस येतो... त्यानं चेक बनवला त जमा करा लागल..अण त्यानं नसल बनवला त आणतोच नं मंग... काय यार येव्हडा वेळ तुमच्या मनानं सांगा " त्यावर जमादार चव्हाण थेर यांना उददेशुन म्हटले " जा... " व मला उददेशुन म्हणाले, याच्यासोबत जा..अशी बोलणी झाल्यानंतर मी व थेर असे पोलीस स्टेशन च्या बाहेर आलो तेथे मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की " चला माहया गाडीवर चला मंग... " मी पोलीस अंमलदार थेर यांना म्हटलो की " मी गाडी आणली हे.. " त्यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की " मी तुम्हालं घेउन जातो वापस घेउन येतो... बर मला पण इथ वापस यायचं आहे नं.. " त्यावर मी थेर यांना म्हटलो " चलो " त्यावर पोलीस अंमलदार थेर मला म्हटले की " कोणता हे तो माणुस तुमचा? ...ते हे अडत वाला..." त्यावर मी थेर यांना म्हटलो " अडत सैफुलाल दलाल त्याले फोनचं लावतो त्याले... म्हणतो पैसे पाहीजेत " त्यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की त्याले भेटुच नं आपण डायरेक्ट.. " त्यावर मी थेर यांना म्हटलो "याहनं मलं सागीतलं अँट्रोसिटी आहे,अण 107 काय सगळं सांगीतलं.... पण ते असं पण मी काय म्हणतो... त्याहणं 20 सांगीलेनं राजेहो... चेक बनवला नाही त आणतो.. नाही त उदया पाहयटं येतो मी... तुमचं म्हणनं काय? चला बाँ. त्यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की " जमदार ले भेटायलं सांगा.... मानसांले भेटायलं सांगीतलं होते क्लिअर क्लिअर... तेचा नंबर दया बर...." त्यावर मी थेर यांना म्हटलो कोणाचा? त्यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की दलालाचा.. त्यावर मी थेर यांना म्हटलो सैफुल्ला का? यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की " हं... हाय का येच्यात? " त्यावर मी थेर यांना म्हटलो ते माहा फोन नाही बायकोचा हे माहा फोन हारपलेला आहे...दाखवा सोडा येच्यात नाही हे बाईचा फोन आहे...यावर मला पोलीस अंमलदार थेर म्हटले की " काय आहे हे ? " थेर यांनी माझी अंगझडती घेतली त्यांना माझे शर्टाचे आत कडक वस्तु लागल्याने त्यांनी ती काढुन घेण्याच प्रयत्न केला त्याला मी विरोध केला व मी पोलीस अंमलदार थेर यांना म्हटलो कुठी... फोन हे ..... चला..... त्यावर पोलीस अंमलदार थेर मला म्हणाले थांबा.. पोलीस अंमलदार थेर यांना माझ्यावर संशय आला परंतु मी मोटर सायकल सुरु करुन त्या ठिकाण वरुन निघुन आलो. सदरची रेकॉर्डींग पोलीस निरीक्षक यांनी पंचासमक्ष ऐकली.

पडताळणी कारवाई दरम्यान पोलीस अंमलदार थेर यांना माझा संशय आल्याने त्यांनी माझी अंगझडती घेतली असता त्यांना माझे शर्टाचे आतील बनीयानला लावलेले व्हाईस रेकॉर्डर त्यांच्या हाताला लागले. त्यांनी मला काय आहे ते काढायला सांगीतले. मी त्यांना घरचा मोबाईल असल्याचे सांगीतले पण त्यांनी माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर काढण्याचा प्रयत्न केला.पण मी त्या ठिकाणाहुन गाडी सुरु करुन निघुन आलो होतो. त्यामुळे पोलीस अंमलदार थेर यांना आपल्यावर ए.सी.बी ची कारवाई होती हे माहीत पडले. म्हणुन मी पोलीस निरीक्षक तिप्पलवाड साहेब यांना विनंती केली की, जमादार चव्हाण व पोलीस अंमलदार थेर हे आता माझ्या कडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत व भविष्यात सुध्दा लाच रक्कम स्विकारील असे मला वाटत नाही.

जमादार शिवदास चव्हाण पोलीस स्टेशन कारंजा ग्रामिण यांनी मी दिलेल्या एन.सी.रिपोर्टवर कारवाई करतो व तुमच्यावर अँट्रोसिटी केस व इतर कारवाई होउ देत नाही या करीता मला 20,000/- रु लाचेची मागणी केली. तसेच पो.काँ . निलेश थेर पोलीस स्टेशन कारंजा ग्रामिण यांनी मला जमादार चव्हान यांच्या करीता लाच देण्यास प्रोत्साहीत केले तसेच लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली.तरी त्यांचेवर कायदेशिर कार्यवाही व्हावी म्हणून माझी त्यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद पो.हवा. आसीफ शेख यांनी टंकलिखीत केली असुन मी वाचून पाहली, माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष सही

(बालाजी तिप्पलवाड )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

( दिलीप बळवंतराव सोळंके )
रा.कवठळ ता.मंगरुळपीर जि.वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
AMBADAS gardal RATHOD
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): POBN70306
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** DINESHCHANDRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN62387